असा. क्र. ३७

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, ऑगस्ट ८, २००५/श्रावण १७, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

### अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.**---महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम .... ४२५-४२८

दिनांक ५ ऑगस्ट २००५ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अ. मा. शिंदेकर,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक ८ ऑगस्ट २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन

व भत्ते अधिनियम आणि महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१९५६ चा मुंबई ४७.
१९५६ चा मुंबई ४८.
१९५६ चा मुंबई ४९.
१९७८ चा महा. ८.

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २००५ असे म्हणावे.

(२) तो, १ एप्रिल २००५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा.**

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ३ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम (या प्रकरणात यापुढे ज्याचा निर्देश " सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये, " रु. २,५०० " या मजकुराऐवजी, " रु. ५,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा मुंबई ४७.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ४अ ची सुधारणा.

३. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ४अ मध्ये, " दोन लाख रुपये " या मजकुराऐवजी, " चार लाख रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ७अ ची सुधारणा.

४. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ७अ मध्ये,—

(क) पोट-कलम (३) मध्ये, " रु. ६,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

१४५/५

(ख) पोट-कलम (४) च्या खंड (अ) मधील, " रु. ६,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

५. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १० मध्ये, " रु. २,३०० " या मजकुराऐवजी, " रु. ४,६०० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १० ची सुधारणा.

६. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १०अ मध्ये, " रु. १५० " या मजकुराऐवजी, " रु. २०० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

७. सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम यांच्या कलम १२ब मध्ये, " रु. ५,००० " या मजकुराऐवजी, " रु. ७,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १२ब ची सुधारणा.

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा.

१९५६ चा मुंबई ४८. ८. महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम (या प्रकरणात यापुढे ज्याचा निर्देश " मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम" असा करण्यात आला आहे.) याच्या कलम ३ मध्ये,— सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

(क) " रु. २,५०० " या मजकुराऐवजी, " रु. ५,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " रु. २,३०० " या मजकुराऐवजी, " रु. ४,६०० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

९. मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ८अ मध्ये, " रु. १५० " या मजकुराऐवजी, " रु. २०० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ८अ ची सुधारणा.

१०. मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १०अ मधील,— सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (३) मध्ये, " रु. ६,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) मधील खंड (अ) मध्ये, " रु. ६,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

११. मंत्र्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १०क मध्ये, " रुपये ५,००० " या मजकुराऐवजी, " रुपये ७,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १०क ची सुधारणा.

प्रकरण चार

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ४ ची सुधारणा.

१२. महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम (या प्रकरणात यापुढे, ज्याचा निर्देश " विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ४ मध्ये, " रु. ४०० " या मजकुराऐवजी, " रु. ५०० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९५६ चा मुंबई ४९.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ५क ची सुधारणा.

१३. विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ५क मधील, पोट-कलम (३) मध्ये, " रु. ६,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

१४. विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ६ मधील,—

(क) पोट-कलम (३) मध्ये, " रु. ५,००० " या मजकुराऐवजी, " रु. ७,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (५) मध्ये, " रु. ६,००० " या मजकुराऐवजी, " रु. ७,५०० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

प्रकरण पाच

## महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याची सुधारणा

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

१५. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ (या प्रकरणात यापुढे, ज्याचा निर्देश " महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये, " रु. २,५०० " या मजकुराऐवजी, " रु. ५,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७८ चा महा. ८.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३अ ची सुधारणा.

१६. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ३अ मध्ये, " रु. १५० " या मजकुराऐवजी, " रु. २०० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ९ ची सुधारणा.

१७. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ९ मधील,—

(क) पोट-कलम (३) मध्ये, " रु. ६,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) च्या खंड (अ) मध्ये, " रु. ६,००० " या मजकुराऐवजी, " रु. ८,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम १०अ ची सुधारणा.

१८. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १०अ मध्ये, " रु. ५,००० " या मजकुराऐवजी, " रु. ७,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई